[वेळ: ३ तास] [गुण: १००]

सूचना: १) उजवीकडील अंक पूर्ण गुण दर्शवितात.
२) अंतर्गत पर्याय लक्षात घ्या.

प्र.१ अ) भरतमुनींचा रससिद्धांत स्पष्ट करा. (१२)

**किंवा**

आ) टिपा लिहा.

१. क्षेमेंद्राचा औचित्यविचार

२. काव्यातील अलंकाराचे महत्त्व

प्र.२ अ) प्लेटोचा, साहित्याच्या स्वरूपाविषयीचा विचार अनुकृती सिद्धांताच्या आधारे स्पष्ट करा. (१२)

**किंवा**

आ) टिपा लिहा.

१. वक्रोक्तीचे सहा प्रकार

२. आनंदवर्धनाचा ध्वनीविचार

प्र.३ अ) शब्दशक्ती म्हणजे काय ते सांगून व्यंजना शब्दशक्तीचे प्रकार व कार्य स्पष्ट करा. (१२)

**किंवा**

आ) टिपा लिहा.

१. काव्यातील प्रतिमा

२. काव्याची भाषा: रूपक

प्र.४ अ) साहित्यनिर्मिती प्रक्रियेमागील प्रतिभेचे स्वरूप सविस्तर स्पष्ट करा. (१२)

**किंवा**

आ) टिपा लिहा.

१. कोलरिजप्रणित कल्पनाशक्तीचे स्वरूप

२. व्युत्पत्ती: एक काव्यकारण

प्र.५ अ) भारतीय साहित्यशास्त्रातील काव्यप्रयोजनांचा थोडक्यात आढावा घ्या. (१२)

**किंवा**

आ) टिपा लिहा.

१. जीवनभाष्य : काव्यप्रयोजन

२. मम्मट प्रणित कोणतीही तीन काव्यप्रयोजने

प्र.६ अ) आय. ए. रिचर्डस् यांचा प्रेरणासंतुलनाचा सिद्धांत विशद करा. (१२)

**किंवा**



8ABC7E38817571ADA7806931AD408457

आ) टिपा लिहा.

१. जिज्ञासापूर्ती : काव्यप्रयोजन

२. अभिनवगुप्ताने सांगितलेली रसविघ्ने

प्र.७ अ) समीक्षा म्हणजे काय ते सांगून समीक्षेतील 'अर्थनिर्णयन' ही संकल्पना विशद करा. **(१२)**

**किंवा**

आ) टिपा लिहा.

१. वाङमयीन मूल्यमापन

२. समीक्षेचे कार्य

प्र.८ पुढील प्रश्नांची पूर्ण वाक्यात उत्तरे लिहा. **(कोणतेही १६)** **(१६)**

१. कुन्तकाने कोणता सिद्धांत मांडला?

२. भामहाने लिहिलेल्या ग्रंथाचे नाव सांगा.

३. प्रतिभेचे अलौकिकत्त्व कशात आहे?

४. अभिधा शक्तीने कळणाऱ्या शब्दांच्या अर्थास काय म्हणतात?

५. वृत्त म्हणजे काय?

६. आलंबन विभाव म्हणजे काय?

७. राजशेखरने प्रतिभेचे कोणते दोन प्रकार सांगितलेले आहेत?

८. भट्टलोल्लटाने स्थायीभाव कोणाच्या ठिकाणी कल्पिले आहेत?

९. कोणतेही चार स्थायी भाव सांगा.

१०. अभिनवगुप्ताने किती रसविघ्ने सांगितलेली आहेत?

११. वामनाने सांगितलेले रीतीचे मुख्य प्रकार कोणते?

१२. 'संभावनाविरह' या रसविघ्नाचा अर्थ काय?

१३. वाङमयीन मूल्यमापनाचे दोन प्रकार कोणते?

१४. गौणी लक्षणा म्हणजे काय?

१५. 'प्रतिभा ही वेडाची बहीण आहे' असे कोणी म्हटले आहे?

१६. "अपूर्व वस्तुनिर्माणक्षम प्रज्ञा प्रतिभामता" असे कोणी म्हटले आहे?

१७. धर्म, अर्थ, काम मोक्ष ही काव्यप्रयोजने कोणी सांगितली आहेत?

१८. जगन्नाथ पंडित यांनी लिहिलेल्या ग्रंथाचे नाव काय?

१९. समीक्षेचे कोणतीही दोन अंगे सांगा.

२०. दंडीने केलेली अलंकाराची व्याख्या कोणती ते लिहा.

********



8ABC7E38817571ADA7806931AD408457